

अॅड राकेश सुनिता तुकाराम सत्वे सर यांची
Educationist, Founder & Director
आ. रा. स. अकॅडमी ऑफ एज्युकेशन अॅण्ड करीअर
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षण अकॅडमी
UPSC-CSE | MPSC | PSI/STI/ASO/SR | JMFC | CDS | SSC

UPSC
CIVIL SERVICES EXAMINATION
MPSC
राज्यसेवा
COMBINE
Group-B PSI/STI/ASO/SR-IR
JMFC
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
फाऊंडेशन कोर्स
FOUNDATION COURSE
UPSC-CDS
COMBINED DEFENCE STAFF
SSC
Staff Selection Commission
SSC-GD/SSC-CHSL/SSC-CGL
RRB
Railway Recruitment Board
IBPS-RRB
BANKING

दिनांक :- ०९ सप्टेंबर २०२४

प्रति,
प्राचार्य/संचालक
डी. जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालय पाली
ता. लांजा, जि.रत्नागिरी

विषय :- परस्पर सामंजस्य करार संदर्भात अंतिम मान्यतेसाठी.

आ.रा.स. अकॅडमी ऑफ एज्युकेशन अॅन्ड करिअर रत्नागिरी या माझ्या स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षण अकॅडमीच्या माध्यमातून आपल्या डी. जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालय पाली महाविद्यालयात "स्पर्धापरीक्षा क्षेत्रातील करिअर मार्गदर्शन आणि व्यक्तिमत्त्व विकास" या विषयावर सोमवार दि.१६ डिसेंबर २०२४ रोजी (पहिले) मार्गदर्शन शिबीराचं आयोजन करण्यात आले होते. या मार्गदर्शनातून प्ररित होऊन वरीष्ठ महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी भविष्यातील स्पर्धापरीक्षांसाठी तयारी करण्यास इच्छिुक आहेत असे दिसून आले.

विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार भविष्यातील प्रशासकिय अधिकारी घडविण्यासाठी डी. जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालय पाली या संस्थेच्या परिसरात नियमित ऑफलाईन प्रशिक्षण वर्ग चालविण्याचे निश्चित करण्यासंदर्भात एकमत करण्यात आले व त्याकरिता अंतिम स्वरुपात परस्पर सामंजस्य करार करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

या संदर्भात डी. जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालय पाली महाविद्यालयातील मुख्याध्यापक/संचालक मंडळ याच्याशी झालेल्या अंतिम चर्चेअंती आ.रा.स. अकॅडमी ऑफ एज्युकेशन अॅन्ड करिअर रत्नागिरी आणि डी. जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालय पाली, ता. लांजा, जि.रत्नागिरी या दोन्ही संस्थामध्ये परस्पर सहाकार्याने दोन्ही संस्थांची शैक्षणिक उद्दिष्टये पूढे नेण्यासाठी आणि संबंधित संस्थेमध्ये स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाकरिता संशोधन वातावरण तसेच स्पर्धापरीक्षा संस्कृतीला प्रोत्साहन देऊन भविष्यात प्रशासकिय/सरकारी अधिकारी घडविण्यासाठी परस्पर सहकार्याची औपचारिकदृष्ट्या सहमती म्हणून पूढील ३ वर्षांसाठी या परस्पर सामंजस्य कराराव्दारे (एमओयू) करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. दोन्ही शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य/संचालक,प्राध्यापक सदस्य आणि कनिष्ठ/वरीष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी या सामंजस्य करारांतर्गत प्रयत्न आणि विचार यासाठी बांधील असतील.

तरी सदर या परस्पर सामंजस्य कराराव्दारे (एमओयू) करण्याचे निश्चित करण्याचे परवानगीचे पत्र संस्थेस प्राप्त करुन देण्यात यावे ही विनंती.

धन्यवाद.

आ. रा. स. एज्युकेशन अकॅडमी स्थापना 2012

आपला,
अॅड राकेश सुनिता तुकाराम सत्वे सर
एज्युकेशनिस्ट, संस्थापक आणि संचालक,
आ.रा.स. अकॅडमी ऑफ एज्युकेशन अॅन्ड करिअर रत्नागिरी
मोबाईल-८३५६८३४६४३

# सामंजस्य करार ( MOU )

यांच्यामध्ये

संचालक
आ.रा.स. अकॅडमी ऑफ एज्युकेशन ॲन्ड करिअर
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षण अकॅडमी, ता.जि. रत्नागिरी

आणि

प्रति,
प्राचार्य/संचालक
डी. जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालय पाली
ता. लांजा, जि.रत्नागिरी

आज दिनांक ०९ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी २:३० वाजता

या सामंजस्य कराराव्दारे –

आ.रा.स. अकॅडमी ऑफ एज्युकेशन ॲन्ड करिअर रत्नागिरी आणि डी. जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालय पाली, ता. लांजा, जि. रत्नागिरी या दोन्ही संस्थांची शैक्षणिक उद्दिष्टे पूढे नेण्यासाठी आणि संबंधित संस्थेमध्ये स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाकरिता संशोधन वातावरण तसेच स्पर्धापरीक्षा संस्कृतीला प्रोत्साहन देऊन भविष्यात प्रशासकिय/सरकारी अधिकारी घडविण्यासाठी परस्पर सहकार्याची औपचारिकदृष्ट्या सहमती म्हणून या सामंजस्य कराराव्दारे (MOU) दिलेली आहे. दोन्ही शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य/संचालक, प्राध्यापक सदस्य आणि कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी या सामंजस्य करारांतर्गत पुढील प्रयत्न आणि विचार यासाठी बांधिल असतील.

परिशिष्ट–अ (कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयाकरिता)

आ.रा.स. अकॅडमी ऑफ एज्युकेशन ॲन्ड करिअर रत्नागिरी यांच्याशी सामंजस्य करार करणाऱ्या डी. जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालय पाली, ता.लांजा, जि. रत्नागिरी शैक्षणिक संस्थेने,
क्र.१ अंतर्गत – विविध शासकिय/सरकारी पदांसाठींची तयारी करुन घेण्यासाठी संबंधित शैक्षणिक संस्थेकडून कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयाकडून अंमलात आणायच्या व पूर्तता करावयाच्या बाबी –

(i) विविध स्पर्धापरीक्षांसाठी इच्छुक विद्यार्थ्यांचा प्रवेश, कोर्स फी स्विकारणे आणि किमान विद्यार्थी संख्येची पूर्तता करणे करिता सहकार्य करणे.

(ii) वर्ग खोली उपलब्ध करुन देणे. (कायमस्वरुपी एकच)

(iii) प्रशिक्षणाची निश्चित वेळ ठरवून देणे (किमान ४ तास कमाल ५ तास)

(iv) विद्यार्थी आणि अकॅडमी यांच्यामध्ये समन्वयाची भूमिका पार पाडण्यासाठी शिक्षक प्रतिनिधीची नियुक्ती (स्पर्धापरीक्षा विभाग प्रमुख)

(v) आवश्यक त्यावेळी ग्राऊंडची उपलब्ध करुन देणे.

(vi) अभ्यासिकेचा वापर करण्याची परवानगी देणे.

(vii) पीपीटी प्रझेन्टेशन साठी प्रोजेक्टरची/स्मार्ट बोर्डाची उपलब्धता (शक्य असल्यास)

क्र.२ अंतर्गत – शासकिय नोकरी/सरकारी नोकरी करिता प्रशिक्षण सत्र/वर्ग चालविण्यासाठी सर्व समर्थन, सहकार्य देऊन विद्यार्थ्यांना प्रशिक्षणातर्गत मार्गदर्शन, विशेष व्याख्याने, लेक्चर्स सत्र देण्यासाठी सर्वोतोपरी मदत करणेस सहमती आहे याकरिता मान्यता देत आहात.

क्र.३ अंतर्गत – विशेषत: गट–अ,ब,क,आणि ड इत्यादीसाठी स्पर्धापरीक्षांसाठीचा पाया मजबूत करण्यासाठी आणि विविध शासकिय/सरकारी पदांसाठी विद्यार्थ्यांचा कौशल्ये विकास आणि क्षमता विकास साध्य करण्यासाठी जसे की, आ.रा.स. अकॅडमीचा स्पेशल फाऊंडेशन कोर्स चालविण्याची सहमती या सामंजस्य कराराव्दारे देत आहात. या कोर्सकरिता कोणत्याही शाखेतील पदवीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी या कोर्सकरिता पात्र आहेत

क्र.४ अंतर्गत – टीसीएस, आयबीपीएस आणि आरआरबी यासारख्या कंपन्यांमार्फत होणाऱ्या सरळसेवा परीक्षांची जसे की, तलाठी भरती, ग्रामसेवक भरती, आरोग्य सेवक भरती, लिपिक भरती, महानगरपालिका भरती, रेल्वे भरती इत्यादीची तयारी करुन घेणाऱ्या कंबाईन्ड कोर्स चालविण्याची सहमती या सामंजस्य कराराव्दारे देत आहे.

क्र.५ अंतर्गत – आ.रा.स. अकॅडमी ऑफ एज्युकेशन ॲन्ड करिअर रत्नागिरी करिता डी. जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालयाचा स्पर्धापरीक्षा विभाग हा सामंजस्य करार अंमलात आणण्यासाठी नोडल विभाग म्हणून काम करेल. तर महाविद्यालयाचे प्राचार्य/अकॅडमीचे संचालक संपूर्ण मार्गदर्शन/प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रमुख कार्यक्रम अधिकारी म्हणून काम पाहतील.

क्र.६ अंतर्गत – डी. जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालयातील पदवीच्या कोणत्याही वर्षात शिकत असलेले कोणत्याही शाखेतील विद्यार्थी आणि संबंधित विभागाचे शिक्षक या सामंजस्य करारांतर्गत तरतुदींची अंमलबजावणी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका

बजावण्याची जबाबदारी देखील घेतील.

परिशिष्ट–ब (आ.रा.स. अकॅडमी ऑफ एज्युकेशन ॲन्ड करिअर रत्नागिरी करिता)

क्र.७ अंतर्गत – या सामंजस्य करारांतर्गत आ.रा.स. अकॅडमी संबंधित कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयातील स्पर्धापरीक्षा तयारीकरिता इच्छुक विद्यार्थ्यांसाठी विविध आयोगांच्या, कंपन्यांच्या मार्गदर्शन आणि प्रशिक्षण सत्रांचे/वर्गांचे नियमित आयोजन करुन त्यांची परिपूर्ण तयारी करुन घेईल.
(१) यूपीएससी सीएससी सनदी सेवा परीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षण वर्ग
(२) एमपीएससी राज्यसेवा परीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षण वर्ग
(३) एमपीएससी कंबाईन्ड परीक्षा (पीएसआय/एसटीआय) मार्गदर्शन आणि प्रशिक्षण वर्ग
(४) फाऊंडेशन कोर्स (५) सरळसेवा परीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षण वर्ग (६) पोलीस भरती वर्ग,
(७) रेल्वे भरती वर्ग (८) बँक भरती वर्ग

क्र.८ अंतर्गत – स्पर्धापरीक्षा क्षमता चाचणी परीक्षेच्या माध्यमातून इच्छुक विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप उपलब्ध करुन देईल. त्याकरिता इनबॉर्न ॲबिलिटी सर्च–स्कॉलरशिप कम एन्ट्रन्स टेस्ट ही परीक्षा आयोजित करेल.
क्र.९ अंतर्गत – भविष्यातील येणाऱ्या सरकारी/शासकिय नोकऱ्यांमधील संधीसाठी मार्गदर्शन वर्ग आयोजित करुन विद्यार्थ्यांना त्याबद्दल जागरुक करण्याचे काम करेल.
(१) परीक्षेची रचना–परीक्षेचे टप्पे–पूर्व/मुख्य/मुलाखत/टाईपिंग टेस्ट/ग्राऊंड/शारिरीक चाचणी
(२) परीक्षेचा पॅटर्न–एमसीक्यू/वर्णनात्मक/सीबीटी (३) अभ्यासक्रमाचे विश्लेषण–विषयवार डिकोडींग
(४) गुणांकन, नेगेटिव्ह मार्किंग, कट ऑफ (५) मुलभूत सर्व विषयांचे मार्गदर्शन

क्र.१० अंतर्गत – या सामंजस्य करारामुळे दोन्ही शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक, संशोधन आणि विविध शासकिय/सरकारी पदांसाठीच्या भरती प्रक्रियेत सामिल होण्यासाठी व्यक्तिमत्त्वाची जडणघडण प्राप्त करणे, सर्वंकष क्षमतांचा विकास साध्य करणे, विविध महत्त्वाची कौशल्ये आत्मसात करणे व त्याव्दारे संस्थेतील विद्यार्थ्यांची जास्तीत जास्त समावेशकता स्पर्धा परीक्षांमध्ये रुजू करुन जास्तीत जास्त शासकिय/सरकारी अधिकारी घडविणे ही आहे.

क्र.११ अंतर्गत – कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयाच्या वर्गाची आणि विद्यार्थ्यांची उपलब्धता आणि दोन्ही संस्थांच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेच्या अधीन राहून सहकार्य केले जाईल अशा उपक्रम किंवा कार्यक्रमांव्दारे शासकिय/सरकारी नोकरीविषयक कौशल्ये आणि क्षमता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास साध्य करणे.

परिशिष्ट–क (दोन्ही शैक्षणिक संस्थांकरिता)

क्र.१२ अंतर्गत – स्पर्धापरीक्षा अंतर्गत परस्पर संमतीच्या अधीन राहून, दोन्ही बाजूंना इष्ट आणि व्यवहार्य वाटेल आणि दोन्ही बाजूंना दोन्ही संस्थांमधील सहकारी संबंधाना प्रोत्साहन आणि विकास करण्यास हातभार लावू शकेल असे वाटणारे कोणतेही कार्यक्रम परस्पर संमतीच्या अधीन आहेत.

क्र.१३ अंतर्गत – हा सामंजस्य करार दोन्ही शैक्षणिक संस्थांच्या योग्य अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केलेल्या तारखेपासून तीन वर्षाच्या कालावधीसाठी लागू राहिल व दोन्ही संस्थांच्या लेखी कराराने ते पूढे वाढविले जाऊ शकते किंवा सुधारित केले जाऊ शकते.

क्र.१४ अंतर्गत – हा सामंजस्य करार कोणत्याही पक्षाकडून तीन महिन्यांची आगाऊ सूचना योग्य त्या वैचारिक/नैतिक/व्यवहारिक कारणांसह लिखित स्वरुपात दिल्यास परस्पर संमतीने संपुष्टात येऊ शकते.

क्र.१५ अंतर्गत – दोन्ही शैक्षणिक संस्थांनी समजावे की, सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांसाठी योग्य आणि समर्पक सर्वोच्च पध्दतीचा अवलंब करुनच संबंधित कोर्सेस मधून जमा होणाऱ्या आर्थिक निधीचे वाटप करण्यांत येईल.

क्र.१६ अंतर्गत – त्याकरिता – डी.जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालयासाठी निधी – डी.जे. सामंत वरीष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेश फीच्या माध्यमातून जमा होणाऱ्या रक्कमेतून खर्च वजा करता निव्वल रक्कमेपैकी २० ते २५ टक्के मोबदला दिला जाणार आहे.

वरील सर्व मुद्यांचा सविस्तर विचार एकमताने सहमतीने स्विकारुन दोन्ही संस्था जास्तीत जास्त शासकिय/सरकारी अधिकारी घडविण्यासाठी प्रयत्नशील आहेत व त्याकरिता सर्वोतोपरी सहकार्य दोन्ही संस्था एकमेकांना देतील म्हणून हा सामंजस्य करार आज गुरुवार दि. २३ जानेवारी २०२५ रोजी अस्तित्वात येत आहे. आणि तो दोन्ही संस्थांना मान्य आहे म्हणून खाली सही करत आहेत.

दिनांक :– ०९ सप्टेंबर २०२४ ठिकाण :– डी.जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालय, पाली, जि.रत्नागिरी

संस्था–१ : संचालक
आ.रा.स. अकॅडमी ऑफ एज्युकेशन ॲन्ड करिअर
स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षण अकॅडमी रत्नागिरी
भाटकर बिल्डींग, पहिला मजला, प्रभाकर उपहारगृहाच्या वर, शुभ मोबाईलच्या वर,
रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर, शिर्के पेट्रोल पंपच्या बाजुला,
जयस्तंभ, ता.जि. रत्नागिरी मोबाईल : ८३५६८३४६४३

सही आणि शिक्का

संस्था–२ : (कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयाचे नांव व पूर्ण पत्ता)
प्राचार्य/संचालक
डी. जे. सामंत वरिष्ठ महाविद्यालय पाली,
ता. लांजा, जि. रत्नागिरी

सही आणि शिक्का

Principal
D. J. Samant Senior College
of Art's, Commerce & Science
Pali, Tal. Dist. Ratnagiri